पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८, लेखा विभाग
क्र.लेखा/२९/कावि/ ८७ /२०२१
दिनांक :- ०५/०३/२०२१

विषय : सातव्या वेतन आयोग फरकाच्या पहिल्या व दुस-या हप्त्याच्या देयकांच्या अदायगीबाबत.

परिपत्रक,

सन २०२०-२१ चे सुधारीत अंदाजपत्रकामध्ये मनपा कर्मचा-यांचा सातव्या वेतन आयोगाच्या फरकाचा पहिला व दुसरा हप्ता अदा करणेकामी र.रू.१२० कोटी तरतूद करणेत आलेली आहे. सर्व विभागांची पहिल्या व दुस-या हप्त्याची देयके सन २०२०-२१ च्या सुधारीत तरतूदीमधून मार्च २०२१ अखेर खर्ची पडणे आवश्यक आहे. परंतु असे निदर्शनास आले आहे की, ब-याच विभागांनी अद्याप त्यांच्या विभागाची सातव्या वेतन आयोगाच्या फरकाच्या पहिला व दुसरा हप्त्याची देयके लेखा विभागास सादर केलेली नाहीत. तसेच कर्मचारी महासंघाकडून सदर देयकांच्या अदायगीबाबत तातडीने कार्यवाही करणेबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

सबब, ज्या विभागांनी सातव्या वेतन आयोगाच्या फरकाच्या पहिला व दुस-या हप्त्याची देयके लेखा विभागास सादर केलेली नाहीत त्यांनी सदरची देयके अदायगीकामी दि.१५ मार्च २०२१ पूर्वी लेखा विभागाकडे सादर करावी. सदरची सन २०२०-२१ ची सुधारीत तरतूद खर्ची न पडल्यामुळे पुढील आर्थिक वर्षातील मुळ तरतूद पुढील हप्त्याच्या अदायगीकामी अपूरी पडल्यास सदरची जबाबदारी ही संबंधीत विभागाची राहील. याची नोंद घ्यावी.

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

प्रति:- सर्व संबंधीत विभाग